# जपानी पुष्परचना भाग - ५

संक्रांतीनंतर थंडी कमी होऊ लागली आणि झाडांची पानगळ पण संपत आली. नवी पालवी झाडावर दिसू लागली आहे. ही कोवळी पालवी, काही झाडांवर सुंदर लाल-केशरी फुले वसंत ऋतूच्या आगमनाला सज्ज झाली आहेत. निसर्गाचे  बदलणारे हे प्रत्येक रूप किती मोहक असते नाही का? प्रत्येक ऋतूला नवा साज, नवे रंग, नवी छटा ! याच ऋतूत आपण होळीचा सण साजरा करतो. हिंदू पंचांगाप्रमाणे फाल्गुन पौर्णिमेला होळी साजरी केली जाते. होळी म्हणजे रंगांचा सण ! होळी म्हणजे दुष्ट, वाईट प्रवृत्तींचा नाश करून चांगले विचार, चांगल्या वृत्तींचा स्वीकार करण्याची संधी ! आपल्या भारतीय परंपरेत प्रत्येक सणामागे काही ना काही चांगला विचार आणि हेतू आहे. दरवर्षी त्याची आठवण या सणाच्या निमित्ताने होऊन, प्रत्येक व्यक्तीला आपल्या आचार-विचारांची पातळी प्रगल्भ करण्याची संधी मिळावी व जीवन समृद्ध, समाधानी, आनंदी व्हावे असा त्यामागचा हेतू असावा. होलिका राक्षसी व हिरण्य कश्यपू, भक्त प्रल्हाद या गोष्टी सर्वांना माहीत असतीलच.

निसर्गाचे हे रूप कवी आपल्या शब्दातून व्यक्त करतो, फोटोग्राफर कॅमेरात टिपतो, चित्रकार त्याच्या कुंचल्यामधून साकारतो, गायक त्याच्या स्वरातून ते आपल्या डोळ्यासमोर उभे करतो, माझ्या सारखे पुष्परचनेच्या माध्यमातून निसर्गाचे हे रूप मांडण्याचा प्रयत्न करतात. यावेळी आपण होळीचा सण आणि वसंत ऋतूचे आगमन दाखवणाऱ्या रचना बघणार आहोत.




रचना १ मध्ये निलगिरीच्या झाडाच्या खोडाचे वाळलेले साल ( Bark of Nilgiri Tree ) वापरून पेटवलेल्या होळीचे दृश्य मांडण्याचा प्रयत्न केला आहे. केशरी व लाल जर्बेरा, पेटलेल्या होळीच्या ज्वालांचे प्रतिनिधित्व करतात. पांढरी स्टॅटीसची नाजूक फुले नव्या व चांगल्या विचार आणि वृत्तींबरोबर राहा असे सांगताहेत आपल्याला !




रचना २ मध्ये खूप रंगीबेरंगी फुले आहेत. यात गुलाबी कारनेशन्स, पिवळी व लाल जर्बेरा, जांभळ्या रंगाचे तुरे, पांढरे स्टॅटीस व सिल्व्हर ओकची पाने वापरली आहेत. आपले आयुष्य सुख, दुःख, आनंद, उत्साह, निराशा, अश्या अनेक छटांनी भरलेले असते. निरनिराळ्या रंगाची फुले निरनिराळ्या छटांचे प्रतिनिधित्व करताहेत. या रचनेतून रंगपंचमी दिसते आहे.




रचना ३ मध्ये वसंत ऋतूचे आगमन दिसते आहे. या रचनेत जंगली बदाम वृक्षाच्या फांद्या वापरल्या आहेत. त्यामध्ये फांद्यांना फक्त नाजूक अश्या कळ्या आहेत व अत्यंत सुंदर दिसणारी लाल फळे सुद्धा आहेत. गेले काही दिवस मी कळ्या येण्याची वाट पाहत होते. लाल फुले व कळ्या असलेल्या फांद्या शेवटी मिळाल्या.

माझ्या घराच्या टेरेसजवळ या फांद्या आल्या असल्यामुळे त्या काढता आल्या. त्या फांद्यांसोबत केशरी रंगाची जर्बेराची फुले व पांढरे स्टॅटीस वापरले आहे. या सुंदर फांद्या वापरून वसंत ऋतूचे आगमन पुष्परचनेमधून दाखवायचा प्रयत्न केला आहे.

तुमच्या सूचना व अभिप्राय या लेखासंबंधी जरूर पाठवा.


**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

( M.Sc. M.Phill. Chemistry )

व्हाईस प्रेसिडेंट, इकेनोबो इकेबाना, पुणे शाखा

e-mail - asdssd@gmail.com